निवासी परकीय चलन (आंतरदेशीय) खाते
निवासी व्यक्तींसाठी सुविधा

भारतीय रिझर्व्ह बँक
एक्सचेंज कंट्रोल विभाग
मुख्य कार्यालय,
मुंबई – ४००००१
एपी. (डीआयआर सिरीज) पसिद्धी क्र. ३७ १ नोव्हेंबर २००२

सर्व अधिकृत परकीय चलन देवाण घेवाण
करणारे व्यापारी

प्रिय महोदया / महोदय,

**निवासी परकीय चलन (आंतरराष्ट्रीय) खाते**
**रहिवासी व्यक्तींसाठी सुविधा**

आरबीआय प्रसिद्धी पत्रक नं. एफओएमए १७/२००० आरबी दि. ३ मे. २००० च्या रेग्युलेशन ३(३) प्रमाणे रहिवाश्यांना २००० युएस डॉलर्स किंवा त्या इतकी रक्कम हाताळता येते या बद्दल संबंधित अधिकृत व्यापाऱ्यांना माहिती आहेच. त्यासाठी सदर परकीय चलन हे नोटांच्या रुपात किंवा ट्रॅवलर्स चेकच्या रुपात संबंधित रहिवाशांचा ताब्यात (१) भारताबाहेर गेले असता घेतले असतील किंवा जी रक्कम भारता मधे असताना देय होती आणि भारता बाहेर गेले असताना व्यापारासाठी वापरली नाही अशी आहे किंवा

२) सदर रक्कम ही भारताबाहेर राहणाऱ्या व्यक्तीने या व्यक्तीला, भारत भेटी साठी आले असतांना दिला आहे किंवा भेट म्हणून दिली आहे किंवा कामाचा मोबदला किंवा कायदेशीर बंधनातून दिली आहे किंवा

३) किंवा भारता बाहेर भेटीस जाताना भेटवस्तू म्हणून मिळाली आहे किंवा मानधन म्हणून मिळाली आहे.
४) किंवा परदेशा मधे प्रवास करताना सदर परकीय चलनाचा वापर केला गेला नाही म्हणून रक्कम शिल्लक आहे.

२) उदारीकरणा साठी एक पाऊल उचलण्याच्या निर्णयामुळे असा निर्णय घेण्यात आला आहे की वर क्र. २ मधील १ ते ४ नुसार रक्कम मिळालेल्या व्यक्तीस भारतीय रहिवाशांना अधिकृत व्यापाऱ्यांचे बरोबर भारता मधे परकीय चलन खाते ज्यास रहिवासी परकीय चलन वलन (आंतरदेशीय) खाते उघडून त्या मधे परकीय नोटा, बँक नोट किंवा ट्रॅव्हलर चेक जमा करता येणे शक्य होईल. या खात्यांमधून देय म्हणून दिली जाणारी रक्कम ही सध्या अस्तित्वात असलेल्या परकीय चलन वलनाशी संबंधित नियमांनुसार केली जाईल.

३) आर एफ सी सी डोमेस्टीक खाते उघडण्याची सुविधाही
अ) ३ मे २००० च्या प्रसिद्धीकरण क्र. फेमा / १०/२००० आरबी क्र. ५ प्रमाणे पुरविली जाईल.

ब) रेग्युलेशन ३ प्रमाणे रोख रक्कम किंवा ट्रॅवलर्स चेक्स ज्यांची किंमत २००० युएस डॉलर्स आहे किंवा त्याच्या इतके परकीय चलन आहे.

क) आणि प्रसिद्धीकरण क्र. फेमा / ११ आरबी २००० दिनांक ३ मे २००० प्रमाणे उपलब्ध आहे.

४) आरबीआय प्रसिद्धीपत्रक क्र. एफओएमए. १० / आरबी २००० दि. ३ मे २००० मधे दुरुस्ती केली असून ते वेगळे वितरीत केले आहे.

५) अधिकृत व्यापाऱ्यानी रहिवासी परकीय चलन खाते (आंतरदेशीय) उघडण्याबाबतच्या सूचना रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयां कडे पाठवाव्यात. हे खाते उघडण्याचे वेळी सर्व अधिकृत व्यापाऱ्यानी नविन खाते उघडण्याचे वेळी असलेले 'नो युवर कस्टमर' संबंधीचे निर्देश पाठावेत.

६) आपल्या संबंधित व्यक्तींना ता प्रसिद्धी पत्रकांतील माहिती सर्व अधिकृत व्यापाऱ्यांनी द्यावयाची आहे.

७) या प्रसिद्धी पत्रकातील निर्देश हे परकीय चलन वितरण कायदा १९७८ ४२/१९९ चे कलम १०(४) व ११(१) प्रमाणे प्रसिद्ध केले आहेत.

आपला विश्वासू<br>
ग्रेस कोशी<br>
मुख्य महाव्यवस्थापक